**<u>ठळक बातम्या</u>**

शिक्षक पात्रता परीक्षेचा पेपर फुटल्याच्या मुद्द्यावरुन विधिमंडळाच्या दोन्ही सभगृहांमधे गदारोळ/ विधानसभेत विरोधकांचा सभात्याग

विधान परिषदेच्या उपसभापतीपदाची निवडणूक येत्या बुधवारी होणार

नसरापूर इथल्या लैंगिक अत्याचार आणि हत्या प्रकरणात आरोपीला फाशीची शिक्षा/ ५८ दिवसात निकाल देणारा राज्यातला सर्वात वेगवान खटला

सेशेल्सचा दौरा यशस्वीपणे पूर्ण करुन प्रधानमंत्री मायदेशी रवाना

**आणि**

अयोध्येच्या श्री रामजन्मभूमी न्यास निधी अपहार प्रकरणी जनहित याचिकेची तातडीनं सुनावणी घ्यायला सर्वोच्च न्यायालयाचा पुन्हा नकार

**<><><><><>**

शिक्षक पात्रता परीक्षेचा पेपर फुटल्याप्रकरणी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात आज गदारोळ झाला. पेपरफुटी प्रकरणी सभागृहात स्थगन प्रस्ताव मांडू देण्याचा विरोधकांचा प्रस्ताव विधानसभा अध्यक्षांनी फेटाळून लावला. पेपरफुटीशी सरकारचा थेट संबंध आहे अशी चर्चा असल्याचं सांगत याप्रकरणी सरकारची भूमिका स्पष्ट व्हायला हवी अशी मागणी भास्कर जाधव यांनी केली. तर या पेपरची छपाई परराज्यात का केली असा सवाल विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. स्थगन प्रस्ताव मांडू न दिल्यामुळे विरोधकांनी सभात्याग केला. याबाबत सरकारतर्फे सभागृहात आजच सविस्तर निवेदन केलं जाईल, असं शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी यावेळी सांगितलं.

यंदाच्या वर्षी दहावी आणि बारावीच्या परीक्षेच्या दरम्यान कॉपी प्रकरणी १०० कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आलं, अशी माहिती शिक्षणमंत्र्यांनी सभागृहात दिली.

टीईटी पेपरफुटीचा मुद्दा विरोधी पक्षांनी आज विधानपरिषदेत उपस्थित केला आणि शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा द्यावा, तसंच या प्रकरणाचा तपास CBIकडे द्यावा, अशी मागणी केली. याबाबत सभागृहात सविस्तर निवेदन करू, असं आश्वासन शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी दिलं. मात्र, शिक्षण आयुक्तांना निलंबित करावं, अशी मागणी करत विरोधकांनी हौद्यात

उतरून घोषणाबाजी केली. यावर सभापतींनी सभागृहाचं कामकाज अर्ध्या तासासाठी तहकूब केलं.

**<><><><><>**

विधानपरिषदेच्या उपसभापती पदाची निवडणूक १ जुलै रोजी घेण्याची घोषणा सभापती राम शिंदे यांनी केली. इच्छुक सदस्यांनी उद्या दुपारी १२ वाजेपर्यंत अर्ज दाखल करावेत. त्यांची छाननी उद्या १ वाजता होईल, असं त्यांनी जाहीर केलं.

वन विभागातल्या आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असून दुर्गम भागात वायरलेस यंत्रणेद्वारे तात्काळ संपर्क साधून वेळेत आगीवर नियंत्रण मिळवण्याचं काम सुरू आहे, तसंच रिअल-टाईम मॉनिटरिंग यंत्रणेसाठी AI आधारित कॅमेऱ्याचा वापर पेंच व्याघ्र प्रकल्पासह इतर ठिकाणी केला जात आहे, असं वनमंत्री गणेश नाईक यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं.

वन्यप्राण्यांना पकडलेल्या किंवा त्यांचा वावर असलेल्या ठिकाणी किंवा बचाव मोहीम सुरू असताना सामान्य नागरिक आणि लोकप्रतिनिधींनी त्या ठिकाणी जाऊ नये, असं केल्यास त्यांच्यावर कारवाई करू, असा इशारा वनमंत्री गणेश नाईक यांनी दिला.

यंदा मार्च आणि एप्रिल महिन्यात राज्याच्या विविध भागांत वादळी वारा, गारपीट आणि अवकाळी पावसाचा फटका १ लाख २२ हजार हेक्टर क्षेत्रावरच्या पिकाला बसला असून ७ लाख ९ हजार शेतकऱ्यांना ७१७ कोटी रुपये नुकसान भरपाईपोटी मंजूर करण्यात आल्याची माहिती मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी दिली.

**<><><><><>**

थोरामोठ्यांच्या कर्तृत्वाची माहिती देणारं नवं पुस्तक शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट केलं जाईल, अशी माहिती शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी महाराष्ट्राच्या विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. राज्यातल्या सर्व शिक्षण मंडळाच्या सर्व शाळांमध्ये मराठी शिकवली जाते की नाही हे पाहण्यासाठी विशेष मोहीम राबवली जाईल, असंही ते म्हणाले. ज्या अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रातल्या शाळांमध्ये मराठी भाषा शिकवली जात नसेल त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असं भुसे यांनी सांगितलं.

कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद किंवा विलीन करण्याचा कुठलाही निर्णय सरकारने घेतला नसल्याचे शिक्षण मंत्र्यांनी लेखी उत्तरात सांगितले.

राज्यात अवैध सावकारी प्रतिबंधक कायदा लागू झाल्यापासून साडे ११ हजार तक्रारी दाखल झाल्या. ८३० हेक्टर पेक्षा अधिक जमीन शेतकऱ्यांना परत दिली असून ५४९ गुन्हे दाखल केल्याची माहिती सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांनी विधानसभेत दिली. नोंदणीकृत सावकारांना शेतीसाठी तारणासह ९ टक्के आणि तारणाशिवाय १२ टक्के दराने कर्जवाटप करता येते. शेतीशिवाय इतर कारणासाठी तारणासह १५ टक्के आणि तारणाशिवाय १८ टक्के दराने सावकार कर्ज देऊ शकतात, असं सहकार मंत्र्यांनी सभागृहात सांगितलं. दरम्यान, सावकारी प्रतिबंधक कायदा असला तरी शेतकऱ्यांचं शोषण सुरूच आहे, असा आरोप विरोधकांनी केला आणि अशा सावकारांविरुद्ध कारवाई करण्याची मागणी केली. यावर शेतकऱ्यांचं सावकाराकडून होणारं शोषण रोखण्यासाठी अधिक कठोर कायदा आणणार असल्याचं पाटील यांनी सांगितलं.

**<><><><><>**

पुणे जिल्ह्यातल्या भोर तालुक्यातल्या नसरापूर इथं साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करून तिची हत्या केल्या प्रकरणातला आरोपी भीमराव कांबळे याला न्यायालयाने फाशीची शिक्षा दिली आहे. पुणे जिल्हा आणि सत्र न्यायालयाचे विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांनी आज हा निर्णय दिला. आरोपीने केलेला गुन्हा अत्यंत क्रूर, अमानुष आणि 'दुर्मीळातील दुर्मिळ' स्वरूपाचा असल्याचं न्यायालयानं नमूद केलं. आरोपीविरोधात सादर करण्यात आलेले परिस्थितीजन्य आणि वैज्ञानिक पुरावे भक्कम असल्याचं निरीक्षण नोंदवत, केवळ वय हा शिक्षेत सवलत देण्याचा आधार ठरू शकत नाही असं न्यायालयाने स्पष्ट केलं.

या प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यापासून ५८ दिवसांत निर्णय देण्यात आल्यामुळे हा राज्यातला सर्वात वेगवान खटला ठरला आहे. या प्रकरणाच्या निकालावर  मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाधान व्यक्त केलं आहे. या निकालामुळे सर्वसामान्यांचा न्यायव्यवस्थेवरचा विश्वास अधिक दृढ झाल्यचाी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही या निकालावर समाधान व्यक्त केलं तसंच न्यायालयाचे आभार मानले.

**- - होल्ड बाईट शिंदे - -**

१ मे रोजी नसरापूर इथं साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करून आरोपीने तिची हत्या केली होती. त्यानंतर राज्यभरात जनक्षोभ उसळला होता.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज सेशेल्सचा तीन दिवसांचा दौरा आटोपून मायदेशी परत यायला निघाले. त्यापूर्वी त्यांनी तिथल्या भारतीय समुदायाशी संवाद साधला. त्यांच्याशी विविध विषयांवर चर्चा केली तसंच त्यांच्यासोबत फोटो काढले. त्यानंतर त्यांनी व्हिक्टोरिया इथं नवशक्ती विनायगर मंदिराला भेट दिली आणि तिथे पूजा केली. तसंच पीस पार्क इथल्या महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तीन दिवसांच्या दौऱ्यात सेशेल्सचे राष्ट्राध्यक्ष पॅट्रिक हर्मिनी यांच्याबरोबर द्विपक्षीय चर्चा केली. काल सेशेल्सच्या राष्ट्रीय दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून सहभागी झाले.

<><><><><>

अयोध्येच्या श्री रामजन्मभूमी न्यासाच्या निधीचा अपहार झाल्याप्रकरणी दाद मागणाऱ्या जनहितयाचिकेवर तातडीनं सुनावणी घ्यायला आज सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. न्यासाच्या कारभारात गैरप्रकार झाले असल्याचा आरोप करुन न्यायालयाच्या देखरेखीखाली या व्यवहाराचं फोरेन्सिक लेखा परीक्षण करण्याचे आदेश द्यावे अशी मागणी याचिकेत केली होती. मात्र न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी तातडीनं करण्याची आवश्यकता नमूद करणारं पत्र सादर करायला सांगितलं. न्यायालयाच्या उन्हाळी सुट्टीनंतर याचिका पुन्हा सुनावणीला ठेवण्याचे आदेश न्यायमूर्ती एमएम सुंदरेश आणि न्यायमूर्ती शील नागू यांनी दिले.

दरम्यान, या प्रकरणातल्या आरोपींचं वकीलपत्र न घेण्याचा ठराव फैजाबाद वकील संघटनेनं केला आहे. याचं उल्लंघन करणाऱ्या वकीलाला ५ लाख रुपये दंड करण्याचा निर्णय वकील संघटनेच्या सर्वसाधारण सभेत आज घेण्यात आला.

<><><><><>

छत्रपती संभाजीनगर मधे शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षासह काँग्रेस तसंच इतर विरोधी पक्षांनी पुकारलेलं आंदोलन स्थगित करत असल्याचं राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते रोहित पवार यांनी जाहीर केलं. शेतकरी कर्जमाफीसह

इतर विविध मागण्यांसाठी विरोधी पक्षांनी आंदोलन पुकारलं होतं. आंदोलनकर्त्यांच्या मागण्या ऐकून घेण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी वेळ द्यावा असं त्यांचं म्हणणं होतं. मुख्यमंत्र्यांनी चर्चेसाठी वेळ दिल्याचं आमदार रोहित पवार यांनी जाहीर केलं, त्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आलं.

**<><><><><>**

राज्यसभेवर नव्यानं निवडून आलेल्या आठ खासदारांनी आज राज्यसभा सदस्यत्वाची शपथ घेतली. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे तसंच महाराष्ट्रातले राजेंद्र जैन यांचा त्यात समवेश आहे.  राज्यसभा अध्यक्ष आणि उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी आपल्या दालनात त्यांना शपथ दिली.

**//<><><><><>//**